ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २१ ऑगस्ट, १९५७ | अंक ३४

## विविध माहिती

**मीठ-संशोधन केंद्राचा विस्तार**—भावनगर येथें मिठाबद्दल संशोधन करणारें केंद्र चार वर्षांपूर्वी स्थापन करण्यांत आलें. आतां त्या केंद्राच्या कामाचा व्याप वाढविण्याचा विचार भारत सरकारनें चालविला आहे. मीठ तयार करण्यासाठीं जें समुद्राचें पाणी वापरलें जातें त्यापासून आणखी कांहीं रासायनिक द्रव्यें तयार करतां येतील काय, ह्याविषयीं संशोधन करण्यांत येणार आहे.

**आंध्रांत कागदाचा कारखाना**—आंध्र राज्यांत शक्करनगर येथें उसाच्या चिपाडांपासून वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार चालू आहे. भारत सरकारच्या नॅशनल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे कारखाना उभारण्यांत येणार आहे. कारखान्याचें रोजचें उत्पादन १०० टन असेल. कारखान्याला उसाच्या चिपाडांचा पुरवठा भरपूर होण्याची खात्री आहे.

**खांडवा-हिंगोली रेल्वे-मार्ग**—दक्षिण भारत व उत्तर भारत ह्यामधील अरुंद रुळांचे रेल्वेमार्ग जोडणारा खांडवा-हिंगोली हा रेल्वेचा फांटा १९५९ च्या अखेरीस तयार होईल. ह्या मार्गासाठी ८·९ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. पण आतां १२·४ कोटी रुपये खर्च येईल, असा दुरुस्त अंदाज आहे.

**भारतांतील घटनांबद्दल आस्था**—ऑस्ट्रेलिआच्या वृत्तपत्रांतून गेले कांहीं दिवस भारतामधील आर्थिक व राजकीय घटनांना बरीच जागा देऊन त्यांच्याबद्दल चर्चाहि करण्यांत आली. एका वृत्तपत्राच्या वार्ताहरानें, भारतापुढें सध्यां पूर्वी कधींहि नव्हते एवढें आर्थिक व द्रव्यविषयक संकट उभें आहे, असें म्हटलें आहे.

**दुधाच्या भुकटीची आयात**—भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें अमेरिकेकडून ५,००० टन दुधाची भुकटी आयात करण्याची व्यवस्था केली आहे. ह्यांपैकी ३,००० टन भुकटी कलकत्ता शहरांत विकण्यांत येणार असून २,००० टन मद्रास शहरांत विकण्यांत येणार आहे. भुकटीच्या विक्रीच्या किंमती लवकरच जाहीर करण्यांत येतील.

**ओरिसाचें औद्योगीकरण**—ओरिसा राज्यानें औद्योगीकरण साधण्यासाठीं राज्य सरकारच्या उद्योगमंत्र्यांनीं एक मोठी योजना तयार केली आहे. राज्यांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासाकडे योजनेंत विशेष लक्ष पुरविण्यांत आलें आहे. योजना अंमलांत आणण्यासाठीं ८३ लाख रुपये खर्च येईल. उद्योगधंद्यांसाठीं कटक, रूरकेला, इत्यादि भागांची निवड करण्यांत आली आहे.

**परदेशीय चलनाची चणचण**—भारताला परदेशीय चलनाची चणचण जाणवत असल्यामुळें राज्य सरकारांनीं आपल्या पाटबंधाऱ्यांच्या कामांची फेरतपासणी करावी, असा आदेश नियोजन समितीनें दिला आहे. ज्या योजनांना परदेशीय चलनाची फारशी गरज लागणार नाहीं, अशाच योजना हातीं घेण्याचें कळविण्यांत आलें आहे.

**भारतीय संस्कृतीचा अभ्यास**—जर्मनींतील गॉटिन्जेन विद्यापीठानें भारतीय भाषा व संस्कृति ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं संस्था स्थापन केली आहे. विद्यापीठांतील एका जर्मन प्राध्यापकानें आपलें तीन मजली सुंदर घर संस्थेसाठीं दिलें आहे. त्याचप्रमाणें, आपल्या संग्रहीं असलेलीं पुस्तकें व हस्तलिखितेंहि त्यांनीं संस्थेला दिलीं आहेत.

**जपानी पोलादाची स्पर्धा**—जपानच्या अंतर्गत बाजारपेठेंत पोलादाला मंदीच्या दिवसांना तोंड द्यावें लागत आहे. त्यामुळें पोलादाच्या कारखान्यांनीं किंमती कमी करून परदेशांतील गिऱ्हाइकांना पोलाद विकण्याची तयारी चालविली आहे. ब्रिटन, भारत व अर्जेंटायना ह्या देशांशीं पोलाद पुरविण्याचे मोठे करार होण्याचा संभव आहे.

**भारताची अभ्रकाची निर्यात**—गेल्या वर्षी कलकत्ता बंदरांत भारतानें २६ लाख हंड्रेडवेट अभ्रक निर्यात केलें. त्याची किंमत सुमारें ६·७० कोटी रुपये आली. अमेरिका व ब्रिटन ह्यांनीं एकूण निर्यातीपैकीं अनुक्रमें ३८·८ टक्के व १९·७ टक्के अभ्रक खरेदी केलें. त्याच्या खालोखाल जर्मनीनें ११·८ टक्के अभ्रक खरेदी केलें.

दातांच्या स्वच्छतेसाठीं
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## जी. डी. सी. अँड ए. परीक्षेबाबत अडचणी आणि त्यांवर सुचविलेला उपाय

श्रीमान् संपादक ' अर्थ ' यांसी:—

स. न. वि. वि.

सहकार व बँकिंगवरील अनेक प्रश्नांना आपण आपल्या साप्ताहिकामध्यें वाचा फोडीत असल्यानें ' जी. डी. सी. अँड ए. ' परीक्षेबाबत परीक्षार्थींना भासणाऱ्या अडचणी—ज्या मी स्वतः अनुभवल्या नि मी उत्तीर्ण झालों असलों तरी अनेकांना यापुढेंहि भासतील—आपणांपुढें प्रसिद्धीकरतां मांडीत आहें. आपण त्यांचें महत्त्व जाणून त्या प्रसिद्ध कराल असा विश्वास आहे.

( १ ) सहकारी खात्यांतील अधिकाऱ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय प्रमोशन्स मिळत नाहींत, वा वरच्या ठराविक अधिकारपदावर नेण्यांत येत नाहीं, इतकें जी. डी. सी. अँड ए. चें अनिवार्य महत्त्व आहे नि तें योग्यच आहे. परंतु वाढत्या सहकारी चळवळीच्या कामामध्यें या परीक्षेच्या अभ्यासास जी उसंत मिळावयास हवी, ती नोकरींतील माणसास मिळत नाहीं, असा अनुभव आहे.

( २ ) या परीक्षेकरतां नेमलेल्या विषयांचा अभ्यास स्वतः घरीं करणें हें सामान्य बुद्धिमत्तेच्या ( Average intellignce ) व्यक्तीच्या आंवाक्याबाहेरचें होऊन बसतें. जीं पुस्तकें याकरतां नेमलेलीं आहेत तींहि इतकी विविध नि बरींच आहेत, कीं त्यांचा अभ्यास उरकणें अवघड व्हावें.

( ३ ) यंदाचे सालापासूनच या परीक्षेचे अभ्यासक्रमामध्यें आमूलाग्र बदल करण्यांत आला असून रूरल क्रेडिट सर्व्हे-रिपोर्टमध्यें सहकारी चळवळीस अग्रस्थान देण्याचे हेतूनें ज्या शिफारशी करण्यांत आल्या आहेत त्या अमलांत आणण्यास योग्य असा अधिकारी या शिक्षणांतून निघावा अशी रास्त अपेक्षा धरली आहे. परंतु तीन वेळांच बसतां येण्याची अतिमर्यादित अट, आणि ' लॉ ' चे दोन, ' कोऑपरेशन ' चे दोन पेपर्स असा लांबलचक अभ्यासक्रम, तसेंच ' बँकिंग ' चे पेपरमध्यें ' कोऑपरेटिव्ह बँकिंग ' ला दिलेलें महत्त्व, या सगळ्या फेरबदलामुळें उत्तीर्ण होणें दुरापास्तच झालें आहे.

यावर मला दिसतो तो उपाय असा कीं, रिझर्व्ह बँकेचें आर्थिक मदतीमधून मुंबई प्रॉ. को. इन्स्टिटयूटचे वतीनें पुणें येथें जें को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज चालू आहे त्याच्या एच्. डी. सी. कोर्सकरतां असलेला अभ्यासक्रमच आतां ( स्पेशल अकौंटस् सोडलें तर ) बहुंशीं जी. डी. सी. अँड ए. चे नवीन अभ्यासक्रमाकरतां नेमलेला आहे. मात्र एच्. डी. सी. झालेल्यांना पुनः जी. डी. सी. अँड ए. ला बसावें लागणें किंवा जी. डी. सी. अँड ए. झालेल्यांनाहि पुनः या कॉलेजमध्यें शिकण्यास पाठवणें म्हणजे मेंदूला अनावश्यक ताण व सरकारचे पैशाचाहि दुहेरी अनाठायीं व्यय होय. याऐवजीं सध्यां जी. डी. सी. अँड ए. ला ज्याप्रमाणें मॅट्रिक्युलेट व संमत संस्थांमधून ( Recognised institutions ) वा सहकारी खात्यातून तीन वर्षें काम केलेल्यांना बसतां येतें, अशांनाहि या कॉलेजमध्यें प्रवेश देण्यांत यावा, ( हल्लीं ही प्रवेशाची अट वरील संस्थांत वा सहकारी खात्यांत तीन वर्षें काम केलेला व इंटर उत्तीर्ण किंवा ग्रॅज्युएट अशी आहे. ) व या कॉलेजचे डिप्लोमासच जी. डी. सी. अँड ए. चे बरोबरीनें मान्यता यावी. अर्थात् जी. डी. सी. अँड ए. पूर्वीच झालेल्यांना पुरेसा अनुभव असल्यानें या कॉलेजला पाठवणें आवश्यक नाहीं, हें ओघानेंच आलें.

नियमानुसार जे अधिकारी जी. डी. सी. अँड ए. झालेले असणें आवश्यक आहे त्यांना या कॉलेजमधून शिकवन तयार केल्यास, त्यांना लागोपाठ चारसहा वर्षें दोन्ही ग्रुपस् उत्तीर्ण होण्यांत घालवल्यामुळें दरसाल परीक्षेकरतां रजा, कामामध्यें मनाची व्यग्रता, व अपयशोत्तर मनस्ताप कमी होऊन त्यांतून सरकार अंतिमपक्षीं अधिक काटकसर साधूं शकेल. शिवाय ज्या विशेष उत्साही विद्यार्थ्यांना बाहेरून जी. डी. सी. अँड ए. लवकर होण्याची उमेद असेल, ते स्वतंत्रपणें संधि घेऊं शकतीलच.

वरील अडचणींचा सहकारी शिक्षणाशीं संबंधित असणारे तज्ज्ञ व गव्ह. डिप्लोमा अँड को. बोर्डाचे सभासद सहानुभूतिपूर्वक विचार करतील काय? तसेंच, परीक्षार्थीहि आपल्या अडचणी मोकळेपणीं मांडतील काय? याबाबत अन्य कोणाच्या कांहीं सूचना वा माझे वरील सूचनांस आक्षेप माझे नजरेस आणल्यास मी आभारी होईन.

विटा मर्चंटस् को. बँक लि.,
विटे ( जि. द. सातारा )
दि. १३।८।५७

आपला,
बा. गो. महाजनी
(एच्. डी. सी., जी. डी. सी. अँड ए.)

---

## चेक नापास केल्याबद्दल बँकेची जबाबदारी

के. एम्. परेख ह्यांचें सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अबदुल रहमान शाखेंत ( मुंबई ) चालू खातें होतें. त्या खात्यांत २०-१०-१९५३ रोजीं ३ रु. १४ आणे एवढी शिल्लक होती. त्या दिवशीं स्मॉल कॉजेस कोर्टानें बँकेवर हुकूम बजावून, त्या दिवशीं परेखच्या खात्यांत शिल्लक असलेली रक्कम बँकेनें परेखला काढूं देऊं नये, असें फर्मावलें.

त्यानंतर एक आठवड्यानें परेखनें आपल्या खात्यांत १,००० रु. भरले आणि दुसऱ्याच दिवशीं ९७० रुपयांचा बेअरर चेक काढला. कोर्टाच्या हुकुमाचा आधार दाखवून बँकेनें चेक नापास केला, तशीं परेखनें १,५०० रु. नुकसानभरपाईचा दावा लावला.

स्मॉल कॉजेस कोर्टाचे जज्ज, श्री. एस्. जी. पाटील, ह्यांनीं असा निवाडा दिला कीं, बँकेनें चेकचे पैसे न देण्यांत चूक केली. कोर्टाचा २०-१०-५३ चा हुकूम फक्त त्या दिवशीं परेखच्या खात्यांत शिल्लक असलेल्या ३ रु. १४ आ. स लागूं होता. " चालू खात्याबाबत मनाई हुकूम होता, तो सबंध खात्यालाच लागूं होता; त्या खात्याच्या कांहीं भागापुरताच नव्हता, " हें बँकेचें म्हणणें जज्जांना पटलें नाहीं. चेक नापास केल्यामुळें प्रत्यक्ष नुकसान किती झालें, हें सिद्ध करण्याची जबाबदारी परेखवर नाहीं. परंतु, १,५०० रु. नुकसानभरपाईची त्यांची मागणी अप्रस्तुत आहे, असें ठरवून कोर्टानें परेखला २५ रु. नुकसानभरपाई देववली आणि दाव्याचा खर्च बँकेनें सोसावा असाहि हुकूम केला.

---

## विश्वस्तनिधींच्या अनामत रकमा स्वीकारण्यास १५ जिल्हा बँकांना परवानगी

मुंबई सरकारनें पुढील ११ मध्यवर्ती सहकारी बँकांना विश्वस्तनिधींच्या अनामत रकमा स्वीकारण्याचे बाबतींत मान्यता दिली आहे. अहमदाबाद सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, बडोदा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, मुंबई राज्य को-ऑपरेटिव्ह बँक, भडोच जिल्हा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, खेडा जिल्हा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, उत्तर सातारा जिल्हा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, पश्चिम पंचमहाल को-ऑपरेटिव्ह बँकिंग युनियन लिमिटेड, कलोल, पूर्व पंचमहाल को-ऑपरेटिव्ह बँकिंग युनियन लिमिटेड, दोहाद आणि सुरत जिल्हा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक.

# अर्थ

बुधवार, ता. २१ ऑगस्ट, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतामधील यांत्रिक हत्यारांचा उद्योगधंदा

भारताच्या औद्योगीकरणाचे जे प्रयत्न चालू आहेत त्यांत यांत्रिक हत्यारांचें उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्याला मूलभूत स्वरूपाचें स्थान आहे. कारण, सध्यांच्या संक्रमणकालीं अशा प्रकारचीं हत्यारें परदेशांकडून आयात करणें आवश्यक असलें तरी त्यांची नेहमींची गरज भारतानें स्वतःची स्वतःच भागविणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें अमेरिकेच्या यांत्रिक हत्यारांच्या कारखान्यांच्या प्रतिनिधींनीं भारताचा जो दौरा नुकतांच पुरा केला, तो महत्त्वाचा आहे. प्रतिनिधी मंडळ आपला अहवाल भारत सरकारला कांहीं आठवड्यांत सादर करील.

प्रतिनिधिमंडळाचा दौरा अमेरिकेच्या व्यापारखात्यानें आणि इंटरनॅशनल कोऑपरेशन ॲड्मिनिस्ट्रेशननें पुरस्कृत केलेला होता. मंडळानें आपल्या पांच आठवड्यांच्या दौऱ्यांत हिंदुस्थान मशीन टूल फॅक्टरी, अंबरनाथचा कारखाना, प्रागा टूल्स कॉर्पोरेशन, इत्यादि औद्योगिक संस्थांची पाहणी केली. मंडळाचे पुढारी मि. जॉर्ज मेरिवेदर आपल्या दौऱ्याची त्रोटक माहिती देतांना म्हणाले कीं, भारताला औद्योगिक दृष्ट्या स्वतंत्र व्हावयाचें असेल तर यांत्रिक हत्यारांच्या उद्योगधंद्याच्या विकासाला अग्रस्थान देण्यांत आलें पाहिजे. ह्या धंद्याची वाढ होण्यासारखी आशादायक परिस्थिति देशांत आहे. देशाच्या औद्योगीकरणाचा खूप मोठा कार्यक्रम अल्प कालांत पुरा करण्याचा निश्चय दिसून येत आहे. सध्यां ह्या धंद्याची उत्पादनक्षमता देशाच्या गरजांच्या मानानें बेताची आहे. पण, ती कशी वाढवितां येईल ह्याविषयीं भारत सरकारच्या संबंधित खात्यांना निरनिराळ्या सूचना करण्यांत आल्या आहेत. त्यांना अनुसरून धंद्याची वाढ करण्यांत आली तर भारताला परदेशाहून यांत्रिक हत्यारांची आयात करण्याचें कारण पडणार नाहीं. त्यामुळें अर्थातच परदेशीय चलनाची गरजाहि कमी होईल. आम्ही पाहिलेल्या कारखान्यांत हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या कारखान्याची यंत्रसामुग्री व इतर साधनें चांगलीं आहेत. तथापि, भारतामधील बाजारपेठांत व्यक्त होणाऱ्या गरजा लक्षांत घेऊन ह्या कारखान्याला अधिक साधीं व अचूक काम करणारीं हत्यारें बनवितां येतील. अंबरनाथ येथील कारखान्याच्या विस्ताराच्या योजना चांगल्या असून त्या अमलांत आणल्या गेल्या पाहिजेत. पंजाबमध्यें छोटीं यांत्रिक हत्यारें तयार करण्याचा धंदा आहे. पंजाबमधील कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाचा दर्जा वाढविण्यास आणि त्यांचें उत्पादन ५० टक्क्यांनीं वाढविण्यास वाव आहे.

ह्या धंद्याची वाढ करण्यासाठी अमेरिकन भांडवल व इतर मदत कितपत मिळूं शकेल, ह्या प्रश्नाविषयीं बोलतांना मि. मेरिवेदर म्हणाले कीं, टेक्निकल को–ऑपरेशन ॲड्मिनिस्ट्रेशनमार्फत भारत सरकारला अमेरिकन तंत्रज्ञांची मदत देण्याची व्यवस्था करावी अशी सूचना करण्यांत आली आहे. कारखान्यांचे प्रकार, त्यांची दैनंदिन व्यवस्था, इत्यादि बाबतींत ह्या तंत्रज्ञांनीं मदत करावी. त्याशिवाय परवानापद्धतीचा अवलंब करून अमेरिकन यांत्रिक हत्यारांच्या कारखान्यांकडूनहि भारताच्या ह्या उद्योगधंद्याच्या विकासाला मदत घेण्यांत यावी. अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीचा प्रश्न मात्र वेगळ्या स्वरूपाचा आहे. भारतामधील करपद्धतीचें सध्यां जें चित्र आमच्या नजरेसमोर आहे तें बरेंच अस्पष्ट आहे. ह्या चित्राच्या रेषा अधिक स्पष्ट झाल्याशिवाय आणि अमेरिकन भांडवलदाराला भांडवल गुंतवून नफा मिळविण्याची संधि दिल्याशिवाय तो भारतामधील उद्योगधंद्यांत पैसे घालण्यास तयार होईल असें दिसत नाहीं. अशी परिस्थिति दिसल्याशिवाय त्याला प्रेरणा होणार नाहीं.

---

## पंजाब सरकारची काटकसर मोहीम

पंजाबच्या सरकारनें आपल्या खर्चांत बचत करण्याची मोहीम आखली आहे. मोहिमेंत सुचविण्यांत आलेल्या काटकसरीच्या योजना अमलांत आल्यावर चालू वर्षीं २·५० कोटी रुपयांची बचत होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. काटकसरीच्या मुख्यतः तीन बाबी निवडण्यांत आल्या आहेत. पंजाबची नवी राजधानी जी चंडीगड, तिच्या विकासाबाबत होणाऱ्या खर्चाची तपासणी करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें मंत्री व अधिकारी ह्यांच्या प्रवासावर होणाऱ्या खर्चांतहि बचत करण्याचें धोरण स्वीकारण्यांत येणार आहे. सरकारच्या कामकाजासाठी जी स्टेशनरी वापरण्यांत येते ती बेतानें वापरण्याचाहि विचार करण्यांत येत आहे. चंडीगड येथें जी नवी राजधानी बांधण्यांत येत आहे तिला २४ कोटी रुपये एकूण खर्च येईल, असा ताजा अंदाज आहे. राजधानीची उभारणी करतांना टाळतां येण्यासारखा खर्च टाळण्यासाठी आणि राजधानींतील ज्या मोकळ्या जागा विकण्यांत येत आहेत त्यांची किंमत अधिक येण्यासाठी काय करावें तें सुचविण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली आहे. राजधानींतील एकादा भाग औद्योगिक विभाग म्हणून राखण्यांत यावा अशी सूचना करण्यांत येत आहे. राजधानींत येण्यास नवीन भांडवलाला प्रोत्साहन मिळावें म्हणून चंडीगड ‘औद्योगिक विभाग’ म्हणून जाहीर करण्यांत येण्याचा संभव आहे. मध्यवर्ती सरकारला, शहराला ‘इंडस्ट्रिअल एस्टेट’ म्हणून संबोधण्यांत यावें अशी विनंती करण्यांत येण्याचीहि शक्यता आहे. ह्या मार्गांनीं शहरांतील मोकळ्या जागांच्या किंमती अधिक येतील अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. प्रवासावरील खर्चांत निदान पांच टक्के बचत करण्याचा व स्टेशनरी, फर्निचर, इत्यादींवरील खर्चांत १५टक्के बचत करण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

---

## लष्करामधील नौकरीविषयीं नावड

अमेरिकेच्या लष्करांतील व नाविक दलांतील अधिकाऱ्यांत नौकरीची मुदत संपण्यापूर्वींच राजिनामे देऊन नागरी जीवनांतील नौकऱ्या स्वीकारण्याची वृत्ति वाढूं लागलेली आहे. लष्करांतील साहसी जीवनापेक्षा नागरी सुखासीन जीवनक्रम त्यांना अधिक आवडत असावा असा ह्याचा अर्थ लावण्यांत येत आहे.

१९४६ व १९४७साली ज्यांनीं लष्करी कमिशन्स घेतलीं त्यांच्या पैकीं जवळ जवळ निम्म्या लोकांनीं राजिनामे दिले असून ही प्रवृत्ति अधिक पसरत जाण्याचीं लक्षणें दिसत आहेत. अमेरिकेच्या संयुक्त सेनादलाची माहिती देणाऱ्या नियतकालिकानें दिलेल्या माहितीप्रमाणें लष्करी, नाविक अगर वैमानिक अधिकारी होण्यासाठी ४ वर्षांचा कार्यक्रम पुरा करावा लागतो. ह्या चार वर्षांच्या काळांत प्रत्येक अधिकाऱ्यामागें ३७,७५० डॉलर्स खर्च करावा लागतो. शिक्षण घेऊन तयार झालेल्या अधिकाऱ्यांनीं राजिनामे दिल्यास हा खर्च फुकट जातो. ह्या परिस्थितीनें अमेरिकन सरकार चिंताग्रस्त झालें आहे. लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ३७५ अधिकाऱ्यांची त्यांच्या राजिनाम्याच्या कारणाबद्दल मुलाखत घेतली असतां त्यापैकीं फक्त ८.६ टक्के लोकांनीं लष्करी नौकरीबद्दल आपणांस आस्था नाहीं असें कारण सांगितलें. सुमारें ४४.८ टक्के लोकांनीं असें सांगितलें कीं, नागरी जीवनांतील नोकऱ्यांत अधिक पगार मिळतो व अधिक ऐषआराम करतां येतो म्हणून राजिनामे देत आहों. गेल्या कांहीं वर्षांत युद्धाचीं शस्त्रास्त्रें अधिक प्रलयकारी झालेलीं आहेत. त्यामुळें व्यक्तीच्या शौर्यधैर्यादि गुणांना फारसा वावच उरलेला नाहीं. शिवाय युद्धाची भयानकताहि सर्वांना कळून चुकलेली आहे. त्याचा हा परिणाम असेल काय ?

## उसाच्या चिपाडांपासून कागद तयार करण्याचा विचार

भारतांत शिक्षण व साक्षरता ज्या प्रमाणांत वाढत जाईल त्या प्रमाणांत कागदाची गरजहि वाढत जाणार आहे. कागदाची ही वाढती गरज देशांतच कारखाने काढून भागवितां आली पाहिजे. पण आज तरी तशी परिस्थिति नाहीं. वृत्तपत्रांना लागणारा कागद अजूनहि बऱ्याच प्रमाणांत आयात करावा लागतो. नेपा कागदाची गिरणी काढण्यांत आल्यानें अशा प्रकारचा कांहीं कागद भारतांत तयार होऊं लागला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भारतांत साखरेचे बरेच कारखाने चालू होतील. ह्या कारखान्यांतून ऊंस गाळून झाल्यावर जीं चिपाडें उरतात तीं बहुधा वायांच जातात. चिपाडांचा उपयोग करून कागद तयार करण्याची एक योजना निझाम शुगर फॅक्टरीनें तयार केलेली आहे. पण आतां भारताचें सरकार ह्या दिशेनें विचार करूं लागलें आहे. नियोजन समितीचे एक सभासद डॉ. जे. सी. घोष ह्यांनीं डेहराडून येथील जंगलविषयक संशोधन केंद्रांत भाषण करतांना असें सांगितलें कीं, उसाच्या चिपाडांपासून वृत्तपत्रांना लागणारा ३०,००० टन कागद तयार करण्याच्या एका योजनेचा सरकार विचार करीत आहे. ह्या बाबतींत भारत सरकारला जर्मन तंत्रज्ञांची मदत मिळण्यासारखी आहे. कागद तयार करण्यासाठीं लाकडाच्या गाभ्यापासून तयार केलेला जो लगदा लागतो तो सध्यां नॉर्वेसारख्या देशांकडून आयात करावा लागतो. उसाच्या चिपाडांवर कांहीं रासायनिक क्रिया करून त्यापासून हा लगदा तयार करण्याची कृति जर्मन तज्ज्ञांनीं शोधून काढली आहे. तिचा फायदा घेऊनच अल्प खर्चांत लगदा तयार करतां येणें शक्य आहे. त्यामुळें कागदासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाचा प्रश्न उत्तम तऱ्हेनें सुटू शकेल.

**गांधींच्या ग्रंथांचें कानडी भाषांतर**—गांधी स्मारक निधीतर्फे महात्माजींच्या लिखाणांचीं कानडी भाषांतरें प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. प्रत्येक खंडांत सुमारें ३५० पृष्ठें भरतील येवढा मजकूर असेल. प्रत्येक खंडाची किंमत २ रुपये ठेवण्यांत येईल.

## रशिआंतील नागरी विमानवहातूक

ब्रिटनमधील हवाई वहातुकीच्या तज्ज्ञांचें एक प्रतिनिधिमंडळ रशिआंतील नागरी विमानवहातुकीची व्यवस्था पाहण्यासाठीं गेलें होतें. प्रतिनिधि मंडळाचे नेते मि. जेंकिन्स ह्यांनीं आपल्या रशिआंतील दौऱ्यासंबंधीं 'फ्लाइट' ह्या विमानविषयक मासिकांत लेख लिहिला आहे. आपल्या लेखांत ते म्हणतात कीं रशियाची 'एरोफ्लॉट' ही नागरी विमानवहातूक संघटना जगांत सर्वांत मोठी आहे. येत्या चार वर्षांच्या अवधींत ह्या संघटनेनें आपला विस्तार करण्याच्या खुप मोठ्या योजना आंखल्या आहेत. त्या अंमलांत आल्या म्हणजे प्रवाशांच्या वहातुकींत २८० टक्क्यांनीं आणि मालाच्या वहातुकींत १०० टक्क्यांनीं वाढ झालेली दिसेल. विस्ताराच्या ह्या योजना कल्पनेच्याहि पलीकडे आहेत. मॉस्कोच्या विमानतळावर तर विमानांची गर्दीच गर्दी असते. मि. जेंकिन्स मॉस्कोच्या विमानतळावर उतरले तेव्हां तेथें निरनिराळ्या प्रकारचीं सुमारें १७५ विमानें उतरलीं असल्याचें त्यांना दिसून आलें. ह्या विमानांत चार एंजिनवाल्या विमानांप्रमाणेंच अगदीं अद्यावत् बनावटीचीं जेटवर चालणारीं विमानेंहि होतीं. लवकरच सर्वच नागरी विमानवहातूक जेटवर चालणाऱ्या विमानांमार्फत करण्यांत येणार आहे. फक्त शेतीच्या कामासाठीं वापरलीं जाणारीं विमानेंच काय तीं पंख्यानें चालणारीं राहतील. 'एरोफ्लॉट' संघटना लवकरच 'युक्रेना' नांवाचें नवीन धर्तीचें विमान वापरण्यास सुरुवात करणार आहे. अशीं चार विमानें तयार झालीं असून तीं चालविणाऱ्या सारथ्यांचें सध्यां शिक्षण चालू आहे. त्याशिवाय एका वेळीं १०० प्रवासी नेऊं शकणारें आणखी एका प्रकारचें विमान तयार करण्यांत येत आहे.


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना : १९३५

—भांडवल—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ( भागापोटीं भरलेल्या आगाऊ रकमांसह ) | रु. | २०,५०,०००चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८,००,००,०००चे वर |

—व्याजाचे दरांत वाढ—

नवीन दर

सेव्हिंग्ज बँक ठेवी : द. द. २ टक्के

नवीन सेव्हिंग्ज् योजना : द. द. २½ टक्के

मुदत ठेवी

१ ते २ वर्षे : द. द. ३ टक्के

३ वर्षे : द. द. ३¼ टक्के

५ वर्षे : द. द. ३½ टक्के

रु. १०,००० व त्यावरील रकमा अल्प मुदतीच्या ठेवी म्हणून आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.

रु. २५,००० वरील रकमा पांच वर्षांवरील मुदतीसाठीं स्वीकारल्या जातील.

—व्याजाचे दरांसाठीं लिहा.—

मुख्य कचेरी, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## १९५६ मध्यें बंद पडलेल्या बँका

| राज्य | | बँकांची संख्या | भांडवल | | | ठेवी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अधिकृत | विक्रीस झालेले | वसूल | |
| | | | रु. | रु. | रु. | रु. |
| आंध्रप्रदेश | ... ... | १ | ८५,७१४ | ६७,८८६ | ६७,८८६ | ४२६ |
| मुंबई | ... .. | २ | ६,००,००० | ४,५९,६५० | २,७९,८२५ | ६,८७,१७९ |
| केरळ | ... ... | ५ | १४,००,००० | ५,०५,९९० | ३,५२,५४४ | १५,८१,०३१ |
| मद्रास | ... ... | २ | ७०,००० | २८,३०० | २८,३०० | १७,००० |
| म्हैसूर | ... ... | ३ | ६,८९,२०० | ४,३९,२७० | ५,२४,७४० | १६,२२,८७९ |
| पूर्व पंजाब | ... ... | १ | १०,००,००० | १,०१,००० | ५१,००० | १०,३९,००० |
| उत्तर प्रदेश | ... ... | १ | २,००,००० | १,००,००० | १,००,००० | ... |
| पश्चिम बंगाल | ... ... | ४ | ३२,००,००० | ५,७२,४५० | ५,७२,४५० | ५,२८,००२ |
| | एकूण ... | १९ | ७२,४४,९१४ | २२,७४,५४६ | १९,७६,७४५ | ५४,६५,५१७ |

## क्लिअरिंग हाउसेसमधील चेक्सचें क्लिअरिंग
### ( १९५४–५६ )

| केंद्र | | १९५४ | | १९५५ | | १९५६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | चेक्सची संख्या | रक्कम ( लक्ष रु. ) | चेक्सची संख्या | रक्कम ( लक्ष रु. ) | चेक्सची संख्या | रक्कम ( लक्ष रु. ) |
| कलकत्ता | ... | ७६,९४,६९४ | २,७५४,२८ | ८०,३५,४८५ | ३,०५६,३१ | ८५,९९,३९७ | ३,०७९,७९ |
| मुंबई | ... | १,२४,५६,५०५ | २,७५८,७५ | १,३३,४४,९१२ | २,९९५,५३ | १,४४,२१,३२९ | ३,२३५,२२ |
| मद्रास | ... | ३९,३७,९५० | ३६१,९४ | ४१,४५,८७३ | ४१२,२१ | ४२,५२,९४९ | ४९६,२४ |
| कानपूर | ... | ८,५६,६२८ | १४१,९० | ८,९५,७८९ | १४६,११ | ९,००,४८१ | १६१,९४ |
| नवी दिल्ली | ... | १०,५३,३४४ | ७९,९८ | १२,१८,२७८ | १०८,५२ | १४,६७,१५१ | १९७,९५ |
| बंगलोर | ... | ८,५९,०५५ | ९८,४८ | ९,१६,४०० | १०२,९४ | १०,२६,००० | १२०,६७ |
| इतर* | ... | ७२,१५,१४६ | ८९८,९३ | ७९,०६,४२६ | ९९७,३९ | ८७,५२,७०३ | १,१४९,३० |
| एकूण | ... | ३,४०,७३,३२२ | ७,०६४,२७ | ३,६४,६३,१६३ | ७,८१९,०१ | ३,९४,२०,१०० | ८,४४१,११ |

*ह्यांत खालील ठिकाणचीं क्लिअरिंग हाउसेस समाविष्ट आहेत :—आग्रा, अहमदाबाद, अलाहाबाद, अलेप्पी, अमृतसर, बरेली, कोचीन, कोइमतूर, डेहराडून, गया, गोरखपूर, हैद्राबाद, जयपूर, जालंदर, कोझीकोड ( कालिकत ), लखनौ, मंगलोर, मदुरा, मुझाफरपूर, नागपूर, दिल्ली, पाटणा, राजकोट, सिमला आणि विजयवाडा.

**सिरिआला रशियाची मदत**—रशिआनें सिरिआला आर्थिक व तांत्रिक मदत देण्याचें मान्य केलें आहे. रशिआची मदत घेऊन सिरिआ रेल्वेमार्ग, रस्ते, पाटबंधारे, विद्युत् केंद्रें व इतर कांहीं कारखाने बांधणार आहे. जरूर तें यंत्रसाहित्य विकत घेण्यासाठी सिरिआला रशिआकडून कर्जहि मिळणार आहे.

**आनंद–बडोदा रेल्वेमार्ग**—पश्चिम रेल्वेवरीलें आनंद ते बडोदा मार्ग सध्यां एकेरी आहे, तो दुहेरी करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी सुमारें १ कोटी रुपये खर्च येईल. मार्गाचें अंतर २२ मैलांचें आहे. मुंबई ते अहमदाबाद रेल्वेमार्गावरील वहातुकींत ह्या २२ मैलांच्या एकेरी मार्गानें बरीच अडचण उत्पन्न होते.

**सिलोनमध्यें तेलाचा कारखाना**—सिलोनच्या नियोजन समितीनें कांहीं परदेशी कंपन्यांच्या साह्यानें अशुद्ध तेल शुद्ध करण्याचा एक कारखाना काढण्याच्या योजनेला अनुकूलता दर्शविली आहे. ह्या कंपन्या ब्रिटिश व अमेरिकन आहेत. कारखान्यासाठी २·८ कोटी डॉलर्स भांडवल लागेल.

**औषधांना दाद न देणारे कीटक**—मनुष्याच्या आरोग्याला घातक असणाऱ्या व विषारी औषधांना दाद न देणाऱ्या कीटकांची संख्या वाढत असल्याचा इशारा शास्त्रज्ञांनीं दिला आहे. १९४६ सालीं माशा व कांहीं प्रकारचे डांस हे दोनच प्रकारचे कीटक डी. डी. टी.ला दाद देत नसत. आतां अशा प्रकारच्या किड्यांची संख्या ३८ झाली आहे. ह्या कामीं संशोधन करण्यास पुरेसा पैसा मिळत नाहीं अशी शास्त्रज्ञांची तक्रार आहे.

**ऑस्ट्रेलियन प्रवाशांना आकर्षण**—ऑस्ट्रेलिअन हौशी प्रवाशांना भारतांत येण्यास आकर्षण वाटावें म्हणून ऑस्ट्रेलिअन नॅशनल एअरवेज ह्या कंपनीनें वाघाच्या शिकारीचें प्रलोभन दाखविलें आहे. अशा दहा प्रवाशांना मध्यप्रदेशांतील जंगलांत वाघाच्या शिकारीची संधि दिली जाईल. प्रत्येक प्रवाशाकडून १,००० ऑस्ट्रेलिअन पौंड घेण्यांत येतील. ऑस्ट्रेलिआंत दुसर एवढाच प्राणी घाडशी शिकारीसाठी मिळूं शकतो.

## अमेरिकेचें उत्पादनतंत्र वापरण्यास अवकाश

पोलादाचा धंदा कोणत्याहि देशाच्या औद्योगिक विकासाचा कणा असल्यासारखा असतो. ही गोष्ट लक्षांत घेऊन तो धंदा स्थापन करण्याचें व त्यासाठी लागणारीं तज्ज्ञ माणसें शिकवून तयार करण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. येत्या पांच वर्षांत भारतामधील १,००० एंजिनिअर्सना अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी व सोव्हिएट रशिआ ह्या देशांना पाठवून पोलादाच्या उत्पादनांत तरबेज करण्यांत येणार आहे. त्यांपैकीं ११५ जणांचा पहिला गट अमेरिकेला गेला असून आणखी ८५ जणांचा गट लवकरच जाणार आहे. अमेरिकेंत गेलेल्या गटाचे नेते श्री. चॅटर्जी अमेरिकेच्या उत्पादनतंत्राविषयीं बोलतांना म्हणाले कीं, "अमेरिकेचें तंत्र भारताला अवलंबिता येणें शक्य आहे. पण त्याचा उपयोग करून रहाणीचें मान अमेरिकेच्या बरोबर आणण्यास फार अवधी लागेल. सध्यां तरी आपलें लक्ष टेलिव्हिजन आणि मोटारी ह्यांच्या उत्पादनाकडे देतां येणार नाहीं. सामान्य हिंदी माणसाच्या आजच्या निकडीच्या गरजा म्हणजे अन्न, रहातीं घरें व शिक्षण ह्या आहेत. पहिल्या प्रथम दारिद्र्याचें उच्चाटन करण्याकडे लक्ष देणें आवश्यक आहे. येत्या कांहीं वर्षांत भारतांत पोलादाचें उत्पादन करणारे तीन कारखाने काढण्यांत येणार आहेत. प्रत्येक कारखान्यांत दरसाल १० लाख टन पोलाद निर्माण करण्यांत येईल. आगामी पांच वर्षांच्या कालांत भारताचें पोलादाचें उत्पादन ६० लाख टनांपर्यंत वाढविलें आलें तरी आमचें समाधान होईल." अमेरिकेचें पोलादाचें वार्षिक उत्पादन १२·५ कोटी टन आहे. फोर्ड फौंडेशन ह्या अमेरिकन संस्थेनें १५ लाख डॉलर्स मदत दिल्यामुळें भारताच्या एंजिनिअर्सना शिक्षण देतां येत आहे.

---

## साखरेची निर्यात चालू ठेवतां येईल काय ?

भारतांत तयार झालेल्या साखरेची निर्यात मोठ्या प्रमाणावर चालू ठेवतां येईल, अशा अपेक्षेमुळें देशांतील अंतर्गत किंमती गेल्या कांहीं दिवसांत एकदम वाढल्या होत्या. उत्पादन-केंद्रांतून साखरेचा उठाव भरभर होत होता. वाहतुकीची व्यवस्थाच अपुरी पडत होती. साखरेवर कांहीं तरी प्रकारचें नियंत्रण ठेवावें लागेल कीं काय, अशीहि शंका व्यक्त करण्यांत येत होती. पण गेल्या कांहीं दिवसांत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील परिस्थितींत एकदम पालट झाला आहे. किंमती एकाएकीं घसरल्या आहेत. ह्यापूर्वी साखरेच्या किंमती चढल्या असल्यामुळें त्यांचा फायदा घेण्यासाठी अनेक उत्पादक देशांनीं आपलें साखरेचें उत्पादन वाढविण्याची खटपट केली. त्याचा परिणाम होऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील किंमती अकस्मात खालीं आल्या. भारताच्या साखरेनें आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत अजून आपलें बस्तान नीट बसविलेलें नाहीं. शिवाय, भारताच्या साखरेच्या दर्जांत अजून सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. बाजारपेठेंत क्यूबाच्या साखरेला अधिक मागणी असते. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून आज असें दिसत आहे कीं, भारताच्या साखरेची मोठ्या प्रमाणावर निर्यात करणें फारसें शक्य होणार नाहीं. शिवाय, भारतामधून निर्यात होणारी साखर आयात करणाऱ्या देशांतील व्यापाऱ्यांपर्यंत पोंचण्यास विलंब लागतो. ह्यामुळें कांहीं ठरलेले सौदेहि रद्द करण्यांत येतात अगर आयातींत कपात करण्यांत येते. भारतामधून १,५०,००० टनांपेक्षा अधिक साखर निर्यात करतां येईल अशीं चिन्हें दिसत नाहींत. ह्या परिस्थितीचा परिणाम साखरेच्या अंतर्गत किंमतीवर होण्याचा संभव आहे.


# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदाळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४५,२३,७०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० | |
| | | रु. ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | | रु. ६१,८३,९०० |
| ठेवी | | रु. १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | | रु. १२,२५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे

ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## सरकारच्या ठेवींत वाढ

ह्या महिन्याच्या प्रारंभीं भारत सरकारनें दोन कर्जें उभारलीं, त्यांचा रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदावर आणि शेड्यूल्ड बँकांच्या आंकड्यांवर झालेला परिणाम उद्बोधक आहे. सरकारी खातीं, शेड्यूल्ड बँका, प्रॉव्हिडंट फंड व ट्रस्ट, इत्यादींनीं कर्जरोखे घेतले, त्यामुळें ९ ऑगस्ट, १९५७ अखेरच्या रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदांत मध्यवर्ती सरकारची ठेव ५१·९६ कोटी रु. वरून ८५·४८ कोटी रुपयांवर गेली. इतर सरकारी ठेवीहि ३·१७ कोटी रु. च्या १६·९० कोटी रु. झाल्या. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी सहाजीकच १०८·३२ कोटी रु. वरून ८५·१३ कोटी रु. वर उतरल्या. बँकांनीं दिलेलीं इतर कर्जें ६९·१८ कोटी रु. चीं १०२·२१ कोटी रु. होऊनहि ठेवींत एवढी मोठी घट झाली. रिझर्व्ह बँकेच्या इनव्हेस्टमेंटसमध्यें १५ कोटी रु. वाढ झाली; ती रक्कम २६५·६० कोटी रु. ची २८०·४१ कोटी रु. झाली. खेळत्या चलनी नोटा १४९९ कोटी रु. च्या १५१६ कोटी रु. वर गेल्या.

## भारताची दहा वर्षांतील प्रगति*

ब्रिटिश राजवटींतहि, भारतामध्यें सामाजिक व आर्थिक उद्धाराचे प्रयत्न चालू होते. त्यासाठीं कार्यक्रमहि आंखण्यांत येत होते. शेती, शिक्षण, कामगारांची परिस्थिति, सार्वजनिक आरोग्य, इत्यादि बाबतींत प्रगति होत गेली. पण ह्या सर्व गोष्टी सरकारी स्थानिक अधिकाऱ्यांवर बहुंशीं अवलंबून होत्या; पैसा उपलब्ध होण्यावर त्यांचा व्याप अवलंबून राही. स्वातंत्र्यापूर्वीच्या ३० वर्षांच्या काळांत त्यांना जनतेचें सहकार्य बेताचेंच मिळे. आतां परिस्थिति पालटली आहे. स्वातंत्र्यानंतर लोकांच्या मनोविकासाला वाव मिळाला, तर तो राष्ट्रीय वाङ्मयांत प्रतिबिंबित व्हायला हवा. आर्थिक प्रगतीला पोषक असें वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी सरकारवर असेल, तर राष्ट्रीय नियोजनांत ती दिसून आली पाहिजे; जनतेचें वाढतें सहकार्य मिळत गेलें पाहिजे. ह्या दृष्टीनें भारतांत दिसून येणाऱ्या परिस्थितीचें दिग्दर्शन प्रस्तुत पुस्तकांत करण्यांत आलें आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळावर गांधीजींच्या तत्त्वांची छाप, आधुनिक भारतांतील भाषाविषयक आणि वाङ्मयीन दिशा, स्वतंत्र भारतांतील नियोजन, शेतीची प्रगति, औद्योगिक प्रगति, शिक्षणाचा विकास, सार्वजनिक आरोग्याची प्रगति, सामाजिक प्रगति, स्त्रियांचें स्थान, इत्यादि विषयांचा गेल्या दहा वर्षांचा आढावा ह्या पुस्तकांत घेतलेला आहे आणि त्या बाबतींत बिहारचे माजी गव्हर्नर श्री. रं. रा. दिवाकर, उत्तर प्रदेशचे माजी गव्हर्नर श्री. कन्हय्यालाल मुनशी, कामगार-रोजगार व नियोजन मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा, सहकारमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख, प्रोफेसर सी. एन. वकील, बडोदा विद्यापीठाच्या व्हाइस चॅन्सेलर श्रीमति हंसा मेहता, डायरेक्टर जनरल ऑफ हेल्थ सर्व्हिसेस ले. क. लक्ष्मणन्, डॉ. जे. एम्. कुमारप्पा, श्री. हॅना सेन व श्री. तारा अलिबेग, अशा नामवंत व अधिकारी व्यक्तींचें लेखन साहाय्य यु. स्टे. इ. सर्व्हिसनें मिळविलें आहे. त्यामुळें, पुस्तकाचें विवेचन अधिकृत व मोलाचें असें झालें आहे.

* The First Decade : Aug. 15, 1947—Aug. 15, 1957. संपादक : क्लिफर्ड मॅनशार्ड. प्रस्तावना : एल्सवर्थ बैंकर (अमेरिकेचे भारतांतील वकील). प्रकाशक : यु. स्टे. इन्फर्मेशन सर्व्हिस.

## किर्लोस्करवाडी येथें पंड्या-पेंढारकर कीर्तिस्तंभ

१९४२ च्या स्वातंत्र्ययज्ञांत आत्माहुति देणारे किर्लोस्कर-वाडीचे शूर नागरिक दे. भ. उमाशंकर रेवाशंकर पंड्या व दे. भ. सदाशिव नारायण पेंढारकर यांच्या स्मरणार्थ उभारलेल्या कीर्तिस्तंभाचा अनावरण समारंभ मुंबई राज्याचे मुख्य मंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्तें किर्लोस्करवाडी येथें रविवार ता. १८ ऑगस्ट १९५७ रोजीं दुपारीं ४ वाजतां झाला.

## ग्रामसेवकांना काँक्रिट तयार करण्याचें शिक्षण

मुंबई राज्यांत १०७० ग्रामसेवकांना या वर्षी काँक्रिट तयार करण्याचें शिक्षण देण्यांत येणार आहे. हें शिक्षण काँक्रिट असोसिएशन ऑफ इंडियातर्फे मांजरी, कोल्हापूर, बडोदें, आणंद, थासरा, सिंदेवाही, जुनागड व परभणी येथील केंद्रांमधून देण्यांत येईल. हा शिक्षणक्रम दहा दिवसांचा असून प्रादेशिक भाषेंतून शिक्षण देण्यांत येणार आहे.

**चीनला ब्रिटिश मोटारींची विक्री**—चीनशीं होणाऱ्या व्यापारावरील निर्बंध सैल करण्यांत आल्यापासून ब्रिटिश मोटार कॉर्पोरेशननें चीनला ९६ हजार पौंड किंमतीच्या मोटारी निर्यात केल्या आहेत. विकण्यांत आलेल्या मालवाहू मोटारींपैकी ११० मोटारी पांच टन वजन वाहून नेणाऱ्या व १० तीन टन वजन वाहून नेणाऱ्या आहेत. त्याशिवाय सुट्या भागांच्या विक्रीविषयीं उभयतां देशांत वाटाघाटी चालू आहेत.

**मध्यप्रदेशांत अल्युमिनमचा कारखाना**—मध्यप्रदेशांत कटनीजवळ अल्युमिनम तयार करण्यासाठी लागणाऱ्या मातीचा सांठा आहे. ह्या खनिजाचा उपयोग करून अल्युमिनम धातु तयार करण्याचा कारखाना काढण्यास परवानगी द्यावी अशी विनंति राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारला केली आहे. विजेचा पुरवठा उत्तर प्रदेशांतून मिळविण्याचा राज्य सरकारचा मानस आहे.

**भारताच्या रेल्वेला पोलादाची टंचाई**—भारताच्या रेल्वे वहातूक व्यवस्थेला दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ५० लाख टन पोलाद लागेल असा अंदाज आहे. सध्यां रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचें एक मंडळ युरोपच्या दौऱ्यावर आहे. शक्य तितकें पोलाद खरेदी करण्याचा तें प्रयत्न करीत आहे. रेल्वेचें निकामी पोलाद विकून टाकूं नये, असा हुकूम काढण्यांत आला आहे.

**पिकांच्या किडीवर उपाय**—आंध्र प्रदेश सरकारनें पिकांवर पडणाऱ्या किडीवर औषधांचे फवारे मारण्यासाठी ३·८ लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्या कामासाठी सर्व सामुग्रीनें सुसज्ज अशा चार मोटारी तयार करण्यांत आल्या आहेत. त्या ग्रामीण भागांत फिरून काम करतील.

**कालवा साफ करण्यासाठी आलेला खर्च**—सुएझचा कालवा साफ करण्यासाठी सुमारें १ कोटी, ८८ लाख डॉलर्स खर्च आला. हा खर्च कालव्यांतून वाहतूक करणाऱ्या दहा देशांकडून कर्ज घेऊन करण्यांत आला. आतां कर्ज परत करण्याच्या व्यवस्थेसंबंधीं संयुक्त राष्ट्रसंघानें विचार चालू केला आहे.


**कण आणि क्षण**

(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## भारतांतील बँकांच्या परदेशांतील कचेऱ्या

| देश | १९५२ शेड्यूल्ड | १९५२ बिगर शेड्यूल्ड | १९५३ शेड्यूल्ड | १९५३ बिगर शेड्यूल्ड | १९५४ शेड्यूल्ड | १९५४ बिगर शेड्यूल्ड | १९५५ शेड्यूल्ड | १९५५ बिगर शेड्यूल्ड | १९५६ शेड्यूल्ड | १९५६ बिगर शेड्यूल्ड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एडन ... | — | — | १ | — | १ | — | १ | — | १ | — |
| ब्रि. पू. आफ्रिका ... | — | — | ४ | — | ७ | — | ८ | — | ९ | — |
| बर्मा ... | ८ | — | ८ | — | ९ | — | ९ | — | ९ | — |
| सिलोन ... | ३ | — | ३ | — | ३ | — | ३ | — | ३ | — |
| फ्रेंच इंडिया ... | ३ | — | ३ | — | — | — | — | — | — | — |
| हाँगकाँग ... | १ | — | १ | — | १ | — | २ | — | २ | — |
| जपान ... | २ | — | २ | — | २ | — | २ | — | २ | — |
| मलाया ... | १२ | — | १२ | — | १२ | — | १२ | — | १३ | — |
| पाकिस्तान ... | ६१ | १२ | ५६ | १२ | ५७ | १० | ५७ | ७ | ५० | ६ |
| थायलँड ... | १ | — | १ | — | १ | — | १ | — | १ | — |
| ग्रेटब्रिटन ... | २ | — | ४ | — | ४ | — | १ | — | ४ | — |
| एकूण ... | ९३ | १२ | ९५ | १२ | ९७ | १० | ९९ | ७ | ९४ | ६ |

### १५ निवडक शेड्यूल्ड बँकांचीं वेगवेगळ्या व्याजाच्या दरानें कर्जें
(आंकडे कोटी रुपयांचे)

| व्याजाचा दर | डिसेंबर, १९५६ चा शेवटचा शुक्रवार — रक्कम | डिसेंबर, १९५६ चा शेवटचा शुक्रवार — एकूण कर्जांशीं प्रमाण |
|---|---|---|
| १. २% पर्यंत | ३·७५ | ०·७ |
| २. २% ते ३% | १·२४ | ०·२ |
| ३. ३% च्या ज्यास्त ते ४% | ७४·७५ | १४·७ |
| ४. ४% च्या ज्यास्त ते ५% | २६२·६० | ५१·७ |
| ५. ५% च्या ज्यास्त ते ६% | १३६·८३ | २६·९ |
| ६. ६% च्या ज्यास्त ते ७% | २३·८९ | ४·७ |
| ७. ७% चे वर | ५·०५ | १·० |
| ८. एकूण | ५०८·११ | १००·० |

**पिस्टन रिंगजचा कारखाना**—मोटारीसारख्या एंजिनांत वापरण्यांत येणाऱ्या पिस्टन रिंगजचा एक कारखाना पतिआळा येथें काढण्यांत आला आहे. कारखान्यासाठी ५५ लाख रुपयांचें भांडवल लागलें. कारखाना खाजगी मालकीचा असून संचालक मंडळावर एक सरकारचा संचालक घेण्यांत आला आहे. दरसाल ५० लाख रिंग तयार करूं शकणाऱ्या ह्या कारखान्याला जर्मन तज्ज्ञांची मदत मिळाली आहे.

**अशोक हॉटेलला आलेला खर्च**—दिल्ली येथें बांधण्यांत आलेल्या विलासी अशोक हॉटेलसाठी २ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. आतां हा खर्चाचा आंकडा २·७५ कोटी रुपयांपर्यंत जाईल असें समजतें. नौकरांसाठी बिऱ्हाडाच्या जागा व मूळ इमारतींमधील कांहीं सोयी ह्यांचा अंतर्भाव पहिल्या अंदाजांत करण्यांत आला नव्हता.


# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लट्ठे रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,७१,५०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,६१,००० |

—यच्चयावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. के. ए. चौगुले, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली — चेअरमन

श्री. एम. बी. चौगुले, शाहुपुरी–कोल्हापूर — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. — मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | : | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१–७–५७ — बा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.